MHOS090013782024

**<u>आदेश नि.क्र. ४६ वर</u>**

वादीने प्रस्तुत अर्ज मयत वादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरीता दिलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना वादी क्र.२ सत्यभामा मल्लीकार्जून घोडके या दिनांक ११/०७/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. वादीस महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने वादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी त्यांना विलंब झालेला आहे. त्यामुळे वादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले होते. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करून असे कथन केले की, वादी हे मयत दिनांक ११/०७/२०२५ रोजी झालेली असून सदर वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता ९० दिवसांचा विलंब झालेला असून सदर अर्जाचे कारण खोटया स्वरुपाचा आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

**४.** वादीने वादी क्र.२ मयत झाल्याचे कथन प्रस्तुत अर्जामध्ये केले आहे. सदर कथनाचे पुष्टयर्थ त्यांनी शपथपत्र दाखल केले आहे. तसेच वादी क्र.२ मयत झालेबाबत मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दस्त यादी निशाणी क्र. ४५ खाली दाखल केले आहे. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याचे कोणतेही कारण नाही. प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास वादीला विलंब झाला आहे. त्या विलंबासाठी खर्च बसविणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता वादी यांचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करते.

## आ दे श

अर्ज (नि.क्र.४६) खर्च रक्कम रूपये २००/- प्रतिवादीला देण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

Sd/-
(अमृता धोंडीराम जाधव)
दिनांक ०९/०६/२०२६ २रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
कळंब.